**Estd. 1962**
**Naac 'A' Grade**

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# परिपत्रक

मार्च/एप्रिल/मे -२०२० उन्हाळी सत्रातील परीक्षांबाबत

**संदर्भ- मा. संचालक,(उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र। युएनआय/२०२०/बैठक/विशी-१/४१३१/ए,दिनांक ८ मे ,२०२०**

कोव्हीड-१९ च्या प्रादुर्भावामुळे व तदअनुषंगाने झालेल्या टाळेबंदीमुळे राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांच्या परीक्षा व शैक्षणिक वेळापत्रकाचे नियोजन करण्याकरिता राज्य शासनाने समिती गठीत केली होती. सदर समितीने केलेल्या शिफारसी शासनाने स्वीकृत केल्याचे व त्या अनुषंगाने विद्यापीठानी आवश्यक कार्यवाही करून अधिनिस्त महाविद्यालयांना कळविण्याचे संदर्भीय पत्रान्वये सूचित केलेले आहे.

त्यास अनुसरून प्रस्तुत शिफारसी विद्यापीठाच्या सक्षम प्राधिकरणासमोर सादर करण्यात येत आहेत. तथापि अधिविभागप्रमुख, प्राचार्य, शिक्षक व विद्यार्थ्यांच्या मनात संभ्रम राहू नये व त्यांना सदर बाबीची **प्राथमिक माहिती** अवगत व्हावी या हेतूने खालीलप्रमाणे ठळक बाबी माहितीकरिता कळविण्यात येत आहेत -

**१) अंतिम वर्षामध्ये प्रवेशित असलेल्या विद्यार्थांनी अंतिम सत्राची परीक्षा (लेखी व प्रात्यक्षिक) द्यावयाची आहे. जसे -**

**अ)** दोन वर्षीय अभ्यासक्रमांमध्ये चौथ्या सत्राचे विद्यार्थी व चौथ्या सत्राच्या ज्या विद्यार्थ्यांचे सत्र १,२ व ३ मधील विषय अनुत्तीर्ण असतील, अशा सत्रांच्या परीक्षा अंतिम सत्राच्या परीक्षेपूर्वी होणार आहेत.

**ब)** तीन वर्षीय अभ्यासक्रमांमध्ये सहाव्या सत्राचे विद्यार्थी व सहाव्या सत्राच्या ज्या विद्यार्थ्यांचे सत्र ३, ४ व ५ मधील विषय अनुत्तीर्ण असतील अशा सत्रांच्या परीक्षा अंतिम सत्राच्या परीक्षेपूर्वी होणार आहेत.

**क)** चार वर्षीय अभ्यासक्रमामध्ये आठव्या सत्राचे विद्यार्थी व आठव्या सत्राच्या ज्या विद्यार्थ्यांचे सत्र ५, ६ व ७ मधील विषय अनुत्तीर्ण असतील अशा सत्रांच्या परीक्षा अंतिम सत्राच्या परीक्षेपूर्वी होणार आहेत.

**ड)** पाच वर्षीय अभ्यासक्रमामध्ये दहाव्या सत्राचे विद्यार्थी व दहाव्या सत्रांच्या ज्या विद्यार्थ्यांचे सत्र ७, ८ व ९ मधील विषय अनुत्तीर्ण असतील अशा सत्रांच्या परीक्षा अंतिम सत्राच्या परीक्षेपूर्वी होणार आहेत.

**२)** वार्षिक परीक्षा पद्धती असणाऱ्या पदव्युत्तर पदविका / पदविका अभ्यासक्रमांच्या विद्यार्थांनी अंतिम परीक्षा द्यावयाची आहे

**३)** उपरोक्त प्रमाणे घेण्यात येणाऱ्या परीक्षांसाठी सर्व महाविद्यालये सद्यस्थितीत ही परीक्षा केंद्र म्हणून राहतील.

**४)** अंतिम वर्षाच्या अंतिम सत्रांच्या परीक्षेची सर्व कार्यवाही जसे की, वेळापत्रक जाहीर करणे, परीक्षेचे संचालन व समन्वयन, विद्यापीठाच्या संबंधित परीक्षा विभागामार्फत प्रचलित पद्धतीने होईल.

**५)** अंतिम सत्राखेरीज अ.क्र. १ नमूद असलेल्या अन्य सत्रांच्या परीक्षेचे आयोजन महाविद्यालयीन स्तरावर (वेळापत्रक , बैठक व्यवस्था इ. ) होईल.

**६) ज्यांची परीक्षा न होता निकाल जाहीर होणार आहेत (अंतिम सत्राचे विद्यार्थी वगळून) असे विद्यार्थी खालीलप्रमाणे असतील**

| **अभ्यासक्रम** | **परीक्षा न होता निकाल जाहीर होणार असे सत्र** |
|---|---|
| दोन वर्षीय अभ्यासक्रमातील विद्यार्थी<br>उदा. एम.ए. ,एम.कॉम ,एम.एस्सी इ. | प्रथम वर्ष सत्र- २ |
| तीन वर्षीय अभ्यासक्रम प्रथम, द्वितीय वर्षाचे विद्यार्थी<br>उदा. बी.ए.,बी.कॉम, बी.एस्सी.,बी.बी.ए .,बी.सी .ए | प्रथम वर्ष सत्र- २<br>द्वितीय वर्ष सत्र -४<br>इ. |
| चार वर्षीय अभ्यासक्रमातील प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाचे विद्यार्थी<br>उदा. बी.ई. बी.टेक. इ. | प्रथम वर्ष सत्र- २<br>द्वितीय वर्ष सत्र -४<br>तृतीय वर्ष- सत्र ६ |
| पाच वर्षीय अभ्यासक्रम<br>प्रथम, द्वितीय, तृतीय व चतुर्थ वर्षाचे विद्यार्थी | प्रथम वर्ष सत्र- २<br>द्वितीय वर्ष सत्र -४<br>तृतीय वर्ष- सत्र ६<br>चतुर्थ वर्ष - सत्र ८ |

ज्या सत्रांच्या परीक्षांचे विद्यार्थांचे निकाल जाहीर करण्यात येणार नाहीत (उदा. सत्र १, ३, इ. ) अशा विद्यार्थांच्या परीक्षा शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यानंतर चार महिन्याच्या आत होणार आहेत.

**७)** उपरोक्त क्रं. ६ मध्ये नमूद सत्राच्या या विद्यार्थांच्या परीक्षा न घेता ५०% अंतर्गत गुण ( १०० गुणांत रुपांतरीत) व ५० % लगतच्या सत्रातील परीक्षेचे गुण विचारात घेवून परीक्षेचा निकाल घोषित करण्यात होईल.

उदा. i) दोन वर्षाच्या अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाच्या सत्र दोनच्या विद्यार्थ्यांचा निकाल पुढीलप्रमाणे घोषित होईल.

सत्र -१ मध्ये विद्यार्थ्यांस ६६% गुण असतील तर ६६/२=३३ व सत्र २ मध्ये अंतर्गत गुण ( १०० गुणांत रुपांतरीत) ८०% असतील तर ८०/२=४० असे एकूण ३३+४०= ७३% गुण देवून निकाल घोषित करण्यात येईल.

ii) वरील प्रमाणेच तीन वर्षीय अभ्यासक्रमात सत्र २ व ४ चा निकाल तसेच चार वर्षीय अभ्यासक्रंमात सत्र २, ४, व ६ चा निकाल व पाच वर्षीय अभ्यासक्रमात सत्र २,४,६,८ च्या परीक्षेचा निकाल लगतच्या एकाच सत्राचे ५०% गुणाच्या आधारावर व ज्या सत्राचा निकाल घोषित होणार आहे त्या सत्राच्या ५०% अंतर्गत गुणाच्या आधारे घोषित करण्यात येईल.

८) उपरोक्त प्रमाणे, ज्या विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे निकाल घोषित करण्यात येतील व त्यांना जर श्रेणी सुधारण्यासाठी पुन्हा परीक्षा द्यावयाची असेल तर अशा विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यानंतर चार महिन्याच्या आत परीक्षा अर्ज भरून परिक्षा देता येईल.

९) उन्हाळी सत्र -२०२० करिता विविध अभ्यासक्रमातील, विविध सत्रातील ज्या विद्यार्थ्यांनी काही कारणास्तव परीक्षा अर्ज सादर केलेले नाहीत अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा अर्ज भरण्याकरिता विद्यापीठाद्वारे स्वतंत्रपणे कळविण्यात येईल。

१०) परीक्षेचा कालावधी १ जुलै ते ३१ जुलै २०२० दरम्यान राहील .

**११) उपरोक्त सर्व नमूद बाबी विद्यार्थांमध्ये असलेल्या शंकांचे निरसन करण्यासाठी आहेत. या सर्व बाबी सक्षम प्राधिकरणासमोर निर्णयासाठी ठेवण्यात येत असून प्राधिकरणाच्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल. उपरोक्त बाबीमध्ये झालेले बदल आपणास वेळोवेळी सर्व घटकांना कळविण्यात येतील.**

१२) दूरशिक्षण केंद्राच्या विद्यार्थांना स्वतंत्रपणे कळवण्यात येईल.

**जा.क्र/ शिवाजी वि/ परीक्षा / ३३ /२०२०**
**दिनांक -१५ मे २०२०**

**प्र. संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**